MHBU0600014342014

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | १७/०७/२०१४ |
| नोंदणी तारीख | :– | १७/०७/२०१४ |
| निकाल तारीख | :– | २३/०६/२०२६ |
| कालावधी | :– | **११** वर्षे **११** महिने **०६** दिवस |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खामगांव (न्यायालय क्र. २) यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी – एन. डी. गोळे)

**कि. फौ. अर्ज क्र. २१६/२०१४** **निशाणी क्र. ८१**

**ज्ञानदेव सुखदेव इंगळे,**
वय ६२ वर्ष, कामधंदा– सेवानिवृत्त,
रा. ओम श्री. साई समर्थ सी.एच.एस.,
सिध्दार्थ नगर, कल्याण पुर्व. **....अर्जदार**

..विरूध्द..

**चंद्रकला सिताराम घोपे,**
वय ५३ वर्ष, कामधंदा– व्यापार,
रा. सुटाळपुरा वार्ड क्र. २१, खामगांव,
ता. खामगाव, जिल्हा बुलडाणा. **.... गैरअर्जदार**

---

अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. भगत साहेब
गैरअर्जदारातर्फे श्री. निगम साहेब

---

**न्या य नि र्ण य**

(पारीत दिनांक २३.०६.२०२६)

अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द कलम १२७ (२) फौजदारी प्रक्रिया संहिता

अन्वये खावटी देण्याबाबतचा झालेला आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार हे त्यांच्यामधील फारकत होण्यापुर्वी पती पत्नी होते. त्यांचे लग्न हिंदु रितीरिवाजाप्रमाणे दि. १२.११.१९७३ रोजी संपन्न झाले. अर्जदार व गैरअर्जदार दोन वर्ष मलाड येथे एकत्र राहिले त्यानंतर उल्हासनगर व शेवटी कल्याण येथे राहले. अर्जदार व गैरअर्जदार एकत्र राहत असताना अर्जदार यांच्याकडे संपत्ती नव्हती त्यामुळे त्यांच्यामध्ये वादविवाद होत होते. वादविवादाचे मुख्य कारण हे गैरअर्जदार यांचे तिसऱ्या व्यक्तीसोबत विवाहबाह्य संबंध होते.

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, सन १९७८ मध्ये गैरअर्जदार ही अर्जदाराचे घर सोडुन तिच्या वडिलांकडे माहेरी निघुन गेली. त्यानंतर गैरअर्जदाराने एम.ए.नं.२७/१९८४ नुसार पोटगी मिळण्यासाठी खामगाव न्यायालयात प्रकरण दाखल केले, सदर प्रकरणामध्ये अर्जदार हे गैरअर्जदार होते. सदरचा पोटगीचा अर्ज प्रलंबीत असताना अर्जदाराने सिटी सिव्हील न्यायालय, मुंबई येथे विवाह संबंध विच्छेदीत होऊन मिळण्याकरीता फारकत अर्ज क्रमांक ४१८/१९८५ दाखल केला. सदरचा अर्ज हा गैरअर्जदार ही व्याभिचार करीत होती याकारणावरुन दाखल केला होता. सदरचे प्रकरण हे कौटुंबीक न्यायालय, बांद्रा येथे वर्ग करण्यात आले. दि. ०४.१२.१९९३ रोजी कौटुंबीक न्यायालय, बांद्रा यांनी आदेश पारीत करुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील वैवाहिक संबंध संपुष्ठात आणले. सदर कौटुंबीक न्यायालय, बांद्रा येथील आदेशला गैरअर्जदार यांनी कोठेही आव्हानीत केले नाही. त्यामुळे सदर न्यायालयाचा आदेश हा विनाआव्हानीत राहिला.

४. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदार यांनी वेळोवेळी खावटी/पोटगीची रक्कम मिळण्याकरीता तसेच रक्कम वाढवुन मिळण्याकरीता वेळोवेळी न्यायालयात अर्ज केले. सदरचे अर्ज करताना गैरअर्जदाराने विवाह संबंध विच्छेदनाचा उल्लेख केला नाही. अर्जदारांनी गैरअर्जदाराच्या पोटगी वाढविण्याच्या अर्जास विरोध दर्शविला. परंतु गैरअर्जदाराचे अधिवक्ता सुध्दा ही बाब सिध्द करु शकले नाही की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये विवाह संबंध विच्छेदन हे गैरअर्जदार यांच्या व्यभिचाराच्या कारणावरुन झाले आहे. अर्जदाराची भिस्त ही विविध प्रकरणातील दस्तऐवजांवर तसेच त्यांनी कनिष्ठ

न्यायालय व जिल्हा सत्र न्यायालय खामगाव येथे दाखल केलेल्या दस्तऐवजावर सुध्दा आहे.

५. अर्जदाराने पुढे कथन केले की, दि. ०१.०९.१९८९ रोजी एम.ए. नं. २७/१९८४ मधील पारीत झालेला पोटगी/खावटीचा आदेश हा अर्जदार व गैरअर्जदार यांचे दि. ०४.१२.१९९३ रोजी कौटुंबीक न्यायालय, बांद्रा यांनी विवाह संबंध विच्छेदीत केलेल्या आदेशामुळे रद्द होण्यास पात्र आहेत. तसेच सदरचा आदेश हा गैरअर्जदार यांच्या व्यभिचारामुळे मिळाला आहे. विच्छेदनाचा हुकूमनामा हा आजपावेतो त्याच्याविरुध्द अपील किंवा पुर्निनिरीक्षण न झाल्यामुळे अंतीम आहे. गैरअर्जदार ही आजरोजी सुध्दा व्यभिचारामध्ये श्री. श्रीराम गोतीराम उंबरकर यांच्यासोबत मुळबाळांसह त्यांच्या घाटपुरी येथील शेतावर जिवन जगत आहे.

६. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदाराने विविध न्यायालयात अर्जदाराविरुध्द प्रकरणे दाखल केली परंतु त्यामध्ये वैवाहिक संबंध संपुष्ठात आल्याबाबतची बाब दर्शविली नाही. गैरअर्जदाराने न्यायालयापासुन सत्यता लपवलेली आहे. गैरअर्जदार हिने अर्जदार यांच्याकडुन दि. ०१.०९.१९८९ पासुन ते दि. ३१.१२.२०१२ पर्यंत गैरकायदेशीरीत्या व अप्रमाणिकपणे पोटगी /खावटी अंदाजे रुपये पाच लाख वसुल केलेली आहे. अर्जदार हे सदरचे पोटगीची रक्कम परत मिळविण्यासाठी गैरअर्जदारावर योग्य ते कायदेशीर कारवाई करतील. गैरअर्जदार ही अर्जदाराकडुन खावटीची रक्कम उकळत आहे व व्याभिचारी जिवन सुध्दा जगत आहे.

७. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार यांनी याअगोदर पोटगीची रक्कम रद्द करण्यासाठी दोन वेळा प्रकरणे दाखल केली होती परंतु प्रकरणाचा योग्य पाठपुरावा करु न शकल्यामुळे दुर्देवाने ते खारीज झालेले आहेत. गैरअर्जदार ही वरील परिस्थीतीचा गैरफायदा घेऊन गैरकायदेशीररित्या खोटेपणाने अर्जदाराकडुन पोटगीची रक्कम दरमहा वसुल करीत आहे. गैरअर्जदार हे अर्जदराच्या संपत्तीवर आनंद उपभोग घेत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये पती पत्नीचे नाते आजरोजी अस्तीत्वात नसतानाही गैरअर्जदार ही अर्जदाराकडुन पोटगीची रक्कम प्राप्त करीत आहे. तरी दि. ०१.०९.१९८९ रोजी एम.ए. नं. २७/१९८४ मध्ये प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, खामगाव यांनी पारीत केलेला पोटगीचा

आदेश बाजुला करुन रद्द करण्याची विनंती केली.

८. गैरअर्जदार यांनी प्रकरणात हजर होवुन त्यांच्या लेखी जबाब नि.क्र. ११ वर दाखल केला. गैरअर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की अर्जदाराचा सदरचा अर्ज कायद्याने चालु शकत नाही कारण अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जामध्ये गैरअर्जदाराचे नाव हे जाणुनबुजून चंद्रलेखा सिताराम घोपे नमुद केले आहे जेव्हा की गैरअर्जदाराचे नाव चंद्रकला ज्ञानदेव इंगळे आहे. गैरअर्जदाराने सदर प्रकरणाची प्रत प्राप्त केलेली आहे परंतु चुकीच्या नावामुळे समन्सची बजावणी योग्य झाली असे म्हणता येणार नाही. गैरअर्जदार ही अर्जदाराची आजरोजी सुध्दा पत्नी आहे तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये फारकत झाली असली तरी घटस्पोटीत पत्नी ही पोटगीसाठी पात्र आहे. त्यामुळे अर्जदाराचे सदरचे सर्व अर्ज हे कायद्याने चालु शकत नाहीत.

९. सदरचा अर्ज हा कायद्याने चालु शकत नाही कारण अर्जदाराचा यापुर्वीही किरकोळ फौ. अर्ज क्र. १३८/२००१ हा दि. २०.०२.२०१२ रोजी निकाली निघाला असुन त्यामध्ये सुध्दा या अर्जातील कारणे त्या अर्जामिध्य सुध्दा होते. फौ.प्र.संहिता कलम १२७ नुसार जर काही परिस्थीतीमध्ये बदल झाला तर अर्ज करता येतो परंतु अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही परिस्थीतीमध्ये बदल झाला नाही. त्यामुळे अर्जदाराचा सदरचा अर्ज हा कायद्याने चालु शकत नाही.

१०. अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न दि. ११.१२.१९७३ रोजी हिंदु रितीरिवाजानुसार झाले होते. परंतु गैरअर्जदाराचे विवाहबाह्य संबंध कधीही नव्हते. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कधीही वाद विवाद होत नव्हते. गैरअर्जदार ही आजरोजी सुध्दा अर्जदारासोबत प्रामाणिक आहे व अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वैवाहिक संबंधातुन त्यांना तीन अपत्ये झालेली आहेत.

११. सन १९७८ पासुन गैरअर्जदार ही अर्जदारापासुन वेगळी राहत आहे. अर्जदाराने विनाकारण गैरअर्जदाराला विभक्त केलेले आहे. त्यामुळे गैरअर्जदार जबरदस्तीने अर्जदारापासुन वेगळी राहत आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द पोटगीचे प्रकरण दाखल केले होते व त्यामध्ये पोटगी म्हणुन रुपये १५०/– मंजुर झाले होते. अर्जदाराने सिटी विव्हील न्यायालय, नवी मुंबई येथे फारकतीचा दावा क्र. ४१८/१९८५ दाखल

केला होता. त्यामध्ये दि. ०४.१२.१९९३ रोजी फारकतीचा आदेश मंजुर झाला होता. गैरअर्जदार ही खामगाव येथे एकटी राहत आहे व तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे ती बांद्रा येथील कौटुंबीक न्यायालयात हजर होऊ शकली नाही त्यामुळे फारकतीचा अर्ज एकतर्फा मंजुर झाला होता. अर्जदार यांनी फारकतीच्या आदेशाला बाजुला सारुन त्याची संपत्ती त्यांच्या तीन मुलांना वाटुन दिली आणि अर्जदार व गैरअर्जदार यांनी एक वाटणीचा दस्त दि. १२.१०.१९९९ व करार दि. १४.१०.१९९९ तयार केला. अर्जदार यांनी कौटुंबीक न्यायालय यांनी पारीत केलेला फारकतीचा आदेशाचा स्वीकार केला नाही. गैरअर्जदाराने फारकतीच्या आदेशाला कोणत्याही न्यायालयात आव्हानीत केले नाही परंतु अर्जदाराच्या आदेशा नंतरच्या कृत्यामुळे फारकतीचा हुकूमनामा अस्तीत्वात नाही. त्यामुळे फारकतीचा आदेश हा अंतीम नाही.

१२. गैरअर्जदाराने वेळोवेळी पोटगी वाढविण्यासाठी न्यायालयात अर्ज केले होते परंतु त्यांनी फारकतीची माहिती लपविली हे सत्य नाही. तसेच गैरअर्जदाराचे वकील सुध्दा सदरची बाब नाकारु शकले नसल्याची बाब खोटी आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञ यांनी युक्तीवादामध्ये न्यायालयात नमुद केले होते की अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटुंबीक न्यायालयाने फारकतीचा आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे न्यायालयाने सदरची बाब नाकारुन किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २८/१९९६ मध्ये पोटगीची रक्कम रुपये १५०/– वरुन वाढुन रु. ३००/– केली व त्यानंतर दि. ३०.०८.२०१२ रोजी फौ.कि.अर्ज क्र. १३८/२०११ मध्ये पोटगीची रक्कम रुपये १०००/– केली आहे. अर्जदाराचे संपुर्ण कथन खोटे, चुकीचे व अप्रामणीक आहे व अर्जदाराकडे त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाही.

१३. फारकतीचा हुकूमनामा हा आजरोजी अस्तीत्वात नाही त्यामुळे व्याभिचाराचा केलेला आरोप हा खोटा व चुकीचा आहे. अर्जदाराने याअगोदरच कथन केल्या प्रमाणे फारकतीच्या आदेशाला बाजुला सारुन दूर केले आहे त्यामुळे फारकतीचा हुकूमनामा अंतीम नाही. गैरअर्जदार ही तिच्या मुलांसोबत आजरोजी व्यभिचारी जिवन जगत नाही. गैरअर्जदार ही सिताराम गोतीराम उंबरकर यांच्यासोबत राहत नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराला पोटगीची संपुर्ण रक्कम आजपावेतो दिलेली नाही. गैरअर्जदाराने

न्यायालयासमोर फारकतीच्या हुकूमनाम्याची बाब नमुद केलेली आहे. त्यामुळे अर्जदाराचे संपुर्ण कथन खोटे, बेकायदेशीर व खारीज होण्यास पात्र आहे.

१४. अर्जदाराने यापुर्वीही पोटगी / खावटी रद्द होण्यासाठी अर्ज केले होते व ते अर्ज न्यायालयाने रद्द केले आहेत. गैरअर्जदार आजरोजीही व्यभिचारी जिवन जगत नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराकडुन कधीही गैरकायदेशीररित्या पोटगी प्राप्त केलेली नाही. ती अनैतिक जिवन जगत नाही.

१५. दि. १२.१०.१९९९ रोजी अर्जदाराने त्यांच्या संपत्ती बद्दल नोंदणीकृत वाटणीचा दस्त तयार केला होता व वाटणी त्यांच्या मुलांमध्ये केली. वाटणी करतेवेळी अतुल हा अज्ञानी असल्यामुळे गैरअर्जदाराचे नाव हे पालनकर्ता म्हणुन लावण्यात आले होते. गैरअर्जदार ही आजरोजी अर्जदाराची पत्नी आहे. दि. १४.१०.१९९९ मध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये पती पत्नी असल्याबाबतचा करार झाला होता. मौजे मानेगाव येथील १ हे. ७४ आर. जमीनीवर मागील १४ ते १५ वर्षापासुन अर्जदार व त्यांच्या तीन मुलांची नावे आहेत. अर्जदाराने कौटुंबीक न्यायालय, बांद्रा यांचा फारकतीचा आदेश बाजुला सारला आहे. किरकोळ फौजदारी अर्ज १३८/२००१ मध्ये वि. न्यायालयाने दि. २०.०२.२०१२ रोजी दाखल केलेल्या आदेशामध्ये सदरचे कथन नमुद आहे.

१६. अर्जदाराने पोटगी रद्द करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२७ अन्वये किरकोळ फौजदारी अर्ज दाखल केला होता व त्याचा आदेश दि. ०१.०९.१९८९ रोजी झाला होता. फौ.कि.अर्ज क्र. ९३/१९९५ हा अर्ज सुध्दा दि. १७.०६.१९९७ रोजी खारीज झाला होता. अर्जदार यांना वेळोवेळी अशाप्रकारचे अर्ज करण्याची सवय आहे. सदरचा अर्ज हा कायद्याबाह्य असुन खारीज होण्यास पात्र आहे. अर्जदाराच्या कथनास कोणतेही बळ नाही. अर्जदाराचा अर्ज खोटा, बेकायदेशीर व कायद्यानुरूप नाही त्यामुळे अर्जदाराचा अर्ज रु. १०,०००/– खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

१७. अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री डी.एम.भगत यांनी यूक्तीवाद केला. त्यांनी त्यांच्या यूक्तीवादात अर्जात दाखल केलेल्या गोष्टींचा व पुराव्यात आलेल्या कथनाचा पुर्णउच्चार केला. गैरअर्जदारातर्फे निगम यांनी यूक्तीवाद केला. त्यांनी त्यांच्या यूक्तीवादात अर्जात दाखल केलेल्या गोष्टींचा व पुराव्यात आलेल्या कथनाचा पुर्णउच्चार केला.

अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयार्थ खालील मूद्ये माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसिहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे निर्वाह भत्त्याचा आदेश रद्द होण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | ...नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**१८.** अर्जदार ने स्वतःस निशाणी १४ वर तपासले आहे. त्यानंतर निशाणी ३७ वर पुरसीस दाखल करून अर्जदाराने पुरावा बंद केला आहे. गैरअर्जदार ने स्वतःस निशाणी २७ वर तपासले आहे. त्यानंतर निशाणी ७३ वर पुरसीस दाखल करून गैरअर्जदाराने पुरावा बंद केला आहे.

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ करीताः**

**१९.** अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जातील सर्व कथने पुराव्यात पुर्नउच्चार केली आहे. अर्जदाराने आपल्या पुराव्यात नमूद केले की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये ११.१२.१९७३ रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला होता. परंतु त्यांच्या भांडे व वादविवाद होत असल्यामुळे तसेच गैरअर्जदाराचे तिस–या व्यक्तीशी अनैतिक संबंध असल्यामुळे सन १९८५ रोजी दिनांक ०४.१२.१९९३ रोजी कौटूंबिक न्यायालय बांद्रा यांच्या आदेशान्वये अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये विवाह संपुष्टात आलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील विवाह संपुष्टात होऊन सुध्दा ही गैरअर्जदार अर्जदाराविरुध्द खोटीची केस केली होती. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द वाढीव खावटीची सुध्दा केस केली होती. गैरअर्जदार ही अर्जदाराकडून गैरकायदेशीर रित्या, व खोटे पणाने पोटगी वसूल करत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात फारकत झालेली

आहे. त्यामुळे गैरअर्जदार ही अर्जदाराकडून पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे अर्जदाराच्या विनंती मान्य करण्याची विनंती केली आहे.

२०. गैरअर्जदाराने दाखल केलेल्या जबाबातील सर्व कथने पुराव्यात पुर्नउच्चार केली आहे. गैरअर्जदाराने आपल्या पुराव्यात नमूद केले की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात फारकत झाली असली तरी गैरअर्जदाराला खावटी मागण्याच्या अधिकार आहे. अर्जदाराचा अर्ज हा गैरकायदेशीर अवैध आहे. अर्जदाराने फारकती नंतर ही दिनांक १२.१०.१९९९ रोजी वाटणीपत्र केलेले असून सदर वाटणीपत्र नोंदणीकृत आहे व त्यानुसार त्याची मालमत्ता ही त्याने त्यांची मुले नामे विलास, प्रमोद, व अतुल यांना दिली आहेत. सदर वाटणीपत्राचे वेळेस अतुल हा अज्ञान असल्यामुळे त्याची अज्ञान पालनकर्ता म्हणुन गैरअर्जदार दर्शविण्यात आले आहे. तसेच हि दिनांक १४.१०.१९९९ रोजी अर्जदार व गैरअर्जदारामध्ये झालेल्या करारामध्ये नमुद आहे. या सर्व बाबीवरुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये पती, पत्नीचे नाते कायम दिसण्याचे येत आहेत. बांद्रा न्यायालयाचे फारकतीचे आदेश अपात्र झालेल्या अर्जदाराला सदरचे अर्ज दाखल करण्याचे सवय आहे. या अगोदर ही पोटगी रद्द करण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेले खारीज झालेले आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा.

२१. अर्जदाराने नि.क्र. ३४ ते ३६ खाली कौटूंबिक न्यायालय, बांद्रा एम.जे.पिटीशन क्र. ए–१४८४/१९९०, कौटूंबिक न्यायालय, मुंबई, एम.जे.पिटीशन क्र. ए–१४८४/१९९०, आणि प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी खामगांव येथे फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २७/१९८४ चे न्यायनिर्णयाचे प्रती दाखल केल्या.

२२. अर्जदार यांनी नि.क्र. १४ खाली पुराव्याचे शपथ पत्र दिले. अर्जदाराने उलट तपासात कबुल केले की, त्यांच्या सन १९९३ मध्ये घटस्फोट झाला आहे. घटस्फोटनंतर त्यांनी पुन्हा दुसरे लग्न केले. दुसरे लग्न अनिता शिंदे यांच्याशी झाले. अनिता ही शिक्षीका होत्या. त्या सेवानिवृत्त आहे. अर्जदार हे सुध्दा सेवानिवृत्त आहे. अर्जदाराला अनिता पासून दोन मुली कविता व सविता आहे. अर्जदाराला १८ हजार पेन्शंन आहे. अनिताला ही १८ हजार पेंन्शन आहे. दिनांक १०.१२.१९९९ रोजी त्यांनी एक नोंदणी वाटणी पत्र केले होते. सदर वाटणीपत्र विलास, प्रमोद व अतुल यांच्या नावे आहेत. वाटणी

वेळेस अतुल हा १८ पेक्षा कमी वयाचा होता. त्यामुळे अज्ञान पालनकर्ता म्हणुन गैरअर्जदार यांना ठेवले होते. खामगांव कोर्ट क्र. ३ येथे चंद्रकला व विलास, प्रमोद व अतुल यांनी अर्जदाराविरुध्द मानहानी चे प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार हे एस.पी, एस.डी.ओ., तहसीलदार, जिल्हाधिकारी न्यायालय यांना त्यांना वाटत असलेल्या अप्रिय कथनाबाबत पत्रव्यवहार करतात. त्यांची मानसिक परिस्थिती ठिक नसल्याने त्यांना आठवत नाही की किती वेळा पत्रव्यवहार केले. या आधी दोन वेळा खावटी रद्द करण्यासाठी अर्ज केले होते. त्याचा पाठपुरावा केला नाही म्हणुन सदर अर्ज खारीज झाले. वकीलामार्फत पाठपुरावा केला होता. चंद्रकला यांनी दुसरा विवाह केला नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या विधिज्ञ यांनी उलटतपासातील इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

२३. गैरअर्जदाराने त्यांचे पुराव्याचे शपथ पत्र नि.क्र. २७ खाली दिला. बांद्रा येथील न्यायालयात एकदा हजर झाले होते. अर्जदारचे विरुध्द खामगांव न्यायालयात खावटीची केस दाखल केली होती. बांद्रा न्यायालयात एकदा हजर झाली होती. त्या प्रकरणात जबाब दाखल केला नव्हता. घटस्फोटाचा निकालाविरुध्द अपील दाखल केली नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या विधिज्ञ यांनी उलटतपासातील इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

२४. खावटीचा अर्ज रद्द करण्याची जबाबदारी ही अर्जदारावर आहे. ज्या परिस्थीतीच्या आधारे पुर्वी खावटी मंजूर करण्यात आली होती. त्या परिस्थतीत आदेशानंतर लक्षणीय व महत्वपुर्ण बदल झाला आहे का अथवा खावटी चालु ठेवण्याचा आधारच अस्थितवात राहिलेला नाही की, ही बाब अर्जदाराला पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक आहे.

२५. सदर प्रकरणामध्ये अर्जदाराच्या कथनानुसार त्यांच्या दिनांक ०४.१२.१९९३ रोजी कौटूंबिक न्यायालय बांद्रा यांच्या आदेशान्वये अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये विवाह संपुष्टात आलेला आहे व गैरअर्जदाराने सुध्दा उलटतपासात कबुल केले की, घटस्फोटाचा निकालाविरुध्द अपील दाखल केले नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये घटस्फोट झालेला आहे. परंतु अर्जदाराने उलट तपासात स्पष्टपणे कबुल केले की, दिनांक १०.१२.१९९९ रोजी त्यांनी एक नोंदणी वाटणी पत्र केले

होते. वाटणीपत्र विलास, प्रमोद व अतुल यांच्या नावे आहेत. वाटणी वेळेस अतुल हा १८ पेक्षा कमी वयाचा होता. त्यामुळे अज्ञान पालनकर्ता म्हणुन गैरअर्जदार यांना ठेवले होते. अर्जदाराच्या या उलटतपासावरुन स्पष्ट होते की, अर्जदाराने फारकतीच्या आदेशानंतर गैरअर्जदार व त्यांच्या नावाने वाटणीपत्र केलेले आहे.

२६. अर्जदाराने उलट तपासावरुन असे दिसून येते की, त्यांनी एस.पी, एस.डी.ओ., तहसीलदार, जिल्हाधिकारी न्यायालय यांना त्यांना वाटत असलेल्या अप्रिय कथनाबाबत पत्रव्यवहार केले आहेत. त्यांची मानसिक परिस्थिती ठिक नसल्याने त्यांना आठवत नाही की किती वेळा पत्रव्यवहार केले. तसेच त्यांनी दोन वेळा खावटी रद्द करण्यासाठी अर्ज केले होते. त्याचा पाठपुरावा केला नाही म्हणुन सदर अर्ज खारीज झाले आहेत.

२७. गैरअर्जदार आज रोजी अर्जदारासोबत राहत नाही,गैरअर्जदाराने आजपर्यंत दुसरे लग्न केले नाही. तसेच अर्जदाराने या अगोदर ही खावटी रद्द होण्यासाठी अर्ज केलेले होते व ते रद्द झालेले आहेत. तसेच अर्जदाराने सदर प्रकरणामध्ये खावटी मंजूर झाल्यानंतर त्यांच्या परिस्थितीत लक्षणीय महत्वपुर्ण बदल झाला आहे. तसेच गैरअर्जदार यांच्या खावटी चालू ठेवण्याचा आधार अस्थितवात राहिला नाही याबद्दल लक्षणीय पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

२८. अर्जदाराच्या उलटतपासावरुन हे सिध्द होते की त्यांनी दोन वेळा खावटी रद्द करण्यासाठी अर्ज केला होता व तो पाठपुरावा न केल्यामुळे रद्द झालेला आहे. त्याचप्रमाणे वाटणीपत्र पुर्वीपासून अस्थित्वात असल्याचे देखील पुराव्यावरुन सिध्द होते. त्यामुळे अर्जदाराच्या सदर न्यायालयात दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भाने नव्याने कारणे उदभवल्याचे दिसून येत नाही. गैरअर्जदाराने उलटतपासात फारकत घेतल्याचे जरी कबुल केले असले तरी ही बाब यापुर्वी निकाली निघालेल्या अर्जामध्ये विचारात घेण्यात आली होती. त्यामुळे पुर्वी अस्थितवात असलेल्या न्यायालयाने विचारात घेतलेल्या कथनाचा पुर्नविचार करुन पुन्हा एकदा त्या स्वरुपाचा दिलासा मागणे कायदयाच्या दृष्टीने न्याय योग्य होणार नाही. एकदा सक्षम न्यायालयाने विशिष्ट परिस्थितीचा विचार करुन अर्ज निकाली काढल्यानंतर त्या परिस्थितीच्या आधारे पुन्हा पुन्हा अर्ज दाखल करण्यास प्रोत्साहन

दिल्यास वादविवाद कधीही अंतिमता प्राप्त होणार नाही.

**२९.** कलम १२७ (२) अंतर्गत अर्ज ग्राहय धरण्यासाठी अर्जदाराने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, पुर्वीच्या आदेशानंतर परिस्थितीत असा काही बदल झाला आहे ज्यामुळे निर्वाहभत्ता चालू ठेवण्याचा कायदेशीर पाया नष्ट झाला आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने असा कोणताही नवीन बदल झाल्याचा स्वतंत्र, विश्वासार्ह व ग्राहय पुरावा सादर केला नाही. अर्जदाराने परिस्थितीत कोणताही नवीन लक्षणीय व महत्वपुर्ण बदल झाल्याचे सिध्द केलेले नाही. त्यामुळे अर्जदार मागणीनुसार दिलासा मिळण्यास पात्र नाही.यास्तव मुदद क्र. १ चा निष्कर्ष अंशतःनकारार्थी नोंदविण्यात येतो. मुददा क्र २ करीता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१ फौ.प्र.सं चे कलम १२७ (२) अन्वये अर्जदाराने दाखल केलेला अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२ परिस्थितीनुरुप खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

३ आदेशाची प्रत पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

(सदर न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Digitally signed by NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Date: 2026.06.23 16:05:17 +0530

**(एन. डी. गोळे)**

दिनांक– २३.०६.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. २ खामगांव.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– आकीब खान कलीम खान, लघुलेखक ग्रेड–३

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, खामगांव.

दिनांकः–२३.०६.२०२६.